# महसूल व्यवस्था

## इंग्रज पूर्व काळातील भूमि कर पद्धती

वैदिक काळापासूनच भारतात ग्राम स्वातंत्र्याची कल्पना होती. ग्राम प्रशासनाचा शेवटचा पण अत्यंत महत्त्वाचा घटक होता स्थानीय शासन आणि भूमी कर. ह्या दृष्टीने एकक म्हणून ग्राम कार्य करीत असे. काही लोकांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या आधीच्या काळात म्हणजे मुघल काळात भूमीचे स्वामित्व कोणाकडेही नव्हते. भूमीशी संबंध असणाऱ्या सर्वच घटकांचा त्यावर अधिकार होता. भूमिस्वामी ला करारानुसार ठरलेली रक्कम देत राहील तोपर्यंत शेतकऱ्याला त्याच्याकडे असलेल्या जमिनीवर पिके घेता येत होती. पाटील किंवा ग्रामचा प्रमुख मामलतदाराच्या किंवा नवबाच्या वतीने कर वसूल करीत असे. कराचे प्रमाण साधारणता 1/6 ते 1/3 इतके होते. पाटील दंडाधिकारी म्हणूनही काम पाहत असे. ग्रामाच्या अंतर्गत व्यवस्थेला अनुसरून घ्यावयाची पिके, विशेष प्रकारच्या जमीनीचे विशेष लोकांमध्ये वाटप, सिंचाई व्यवस्था, शेतकऱ्यापासून वैयक्तिक कर वसुली इत्यादी गोष्टी ग्रामपंचायत च्या साह्याने व तेथील प्रथा, परंपरा लक्षात घेऊन पाटील देशमुख देशपांडे कुलकर्णी पार पाडत असे.

## लॉर्ड कॉर्नवालिसच्या पूर्वीची परिस्थिती:-

मोगल राजवटीच्या शेवटच्या कालखंडात जमीनदार हे अधिक प्रभावी व बलशाली झाले होते. इंग्रजी राजवटीत म्हणजे रॉबर्ट क्लाइव्हच्या दुहेरी राज्य व्यवस्थेमध्ये बंगाल,बिहार व ओरिसा प्रांताची दिवाणी हक्क मिळाल्यानंतर बंगालच्या नवाबाने नेमलेल्या नायक जीवनावर जमीन महसुलाच्या वसुलीची जबाबदारी सोपविण्यात आली होती. कंपनीने त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले व जमीन महसूल वसुलीचे काम इंग्रज सुपरवायझर कडे सोपविले. पुढे ते कलेक्टर बनले.तरीही परिस्थितीत फारशी सुधारणा झाली नाही.

वॉरन हेस्टिंगने कलाईव्ह ची ही व्यवस्था व जमीन महसूल वसुलीची पद्धत बंद केली. या प्रश्नाचा आणि शेती व जमीन महसूलाची वसूली यांचा सखोल अभ्यास करून त्याने 1772 मध्ये लिलावाने जमीन देण्याची पद्धत सुरू केली. यात जो कोणी जास्तीत जास्त रक्कम जमीन महसूल पोटी द्यावयास तयार असेल, त्याच्याकडे जमीन सोपविण्यात आली. प्रारंभी ही पद्धत पाच वर्षासाठी होती, पण नंतर ती एका वर्षासाठी करण्यात आली. या पद्धतीमध्ये बरेच दोष होते. यामुळेच जेव्हा कॉर्नवालीस भारतात येण्याचे निश्चित ठरले, तेव्हा दीर्घ मुदतीसाठी जमिनी जमीनदारांना द्याव्यात व त्यांच्याकडून जमीन महसूल घ्यावा अशी पद्धत स्वीकारण्याची सूचना त्याला करण्यात आली. जेणेकरून शेती, शेतकरी व कंपनी सरकार या तिघांच्याही हितसंबंधाचे रक्षण केले जाईल. असे गृहीत धरले होते. जमीनदारांचे पद किंवा अधिकार हे काळाच्या ओघात वंशपरंपरागत बनले होते. तेव्हा त्यांच्या हिताकडे दुर्लक्ष न करता त्यांना समाधानकारक अशी योजना आखावी असे इंग्लंडच्या राज्यकर्त्यांचे मत होते. त्यामुळे हा वर्ग शेती व शेतकरी यांच्या उन्नतीकडे व हिताकडे लक्ष देईल व त्यालाही बऱ्यापैकी उत्पन्न मिळविण्याचे आश्वासन मिळाल्यास तो जमीन महसुलाची वसुली इमानेइतबारे करतील अशी अपेक्षा होती. तेव्हा या संबंधाने सर्वांचे जास्तीत जास्त हित साधणारा तोडगा शोधून काढण्याची जबाबदारी कॉर्नवालीस वर सोपविण्यात आली.

## कॉर्नवालीसचे प्रयत्न / कायमधारा पद्धत

इ.स. 1786 ते 1789 या काळात कॉर्नवॉलिसने मागील काही वर्षातील जमीन महसुलाचे संबंधी आकडेवारी गोळा केली. या कामी त्याला काही सहकार्याची मोलाची मदत झाली. ज्यात रेवेन्यू बोर्डाचा सदस्य व या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ असा सर जॉन शोअर आणि दुसरा आणखी एक तज्ञ जेम्स ग्रँट यांचा प्रामुख्याने समावेश होता.

या मंडळी समोर दोन महत्त्वाचे प्रश्न होते. एक जमिनीची मालकी कोणाकडे आहे हे ठरविणे आणि दोन किती वर्षाच्या कालावधीसाठी ही जमीन महसुलाची व्यवस्था असावी हे ठरवणे. विचारांती असे ठरले की जमीनदार हे जमिनीचे मालक आहेत आणि कंपनी सरकारने

त्यांच्याशीच हा करार करावा. या संबंधाने असे सांगितले जाते की एकूणच या व्यवस्थेत कॉर्नवालीस यांची भूमिका ही जमीनदाराच्या बाजूने होती, कारण तो स्वतः जमीनदाराच्या वर्गातून किंवा कुळातून आलेला होता.

आता दुसरा प्रश्न किती कालावधीसाठी ही योजना असावी हा होता. जॉन शोअर च्या मध्ये 10 वर्षांच्या काळासाठी जमीन महसूल निश्चित करण्यात यावा असे होते, पण स्वतः कॉर्नवालीस मात्र ही योजना दहा वर्षासाठी न ठेवता कायमचे असावी या मताचा होता. तथापि प्रारंभी ही योजना 1790 मध्ये दहा वर्षांच्या काळासाठी तयार करून इंग्लंडमध्ये कंपनीचे संचालक मंडळ आणि इंग्लंडचे शासन यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आली. मात्र ही योजना मंजुरीसाठी पाठविण्यात आल्यानंतर स्वतः कॉर्नवालिसने कंपनीच्या नियंत्रण मंडळाचा अध्यक्ष डुनडास याला ही योजना दहा वर्षासाठी न ठेवता कायम स्वरूपाची करावी असे कळविले. डूनडास आणि इंग्लंडचा पंतप्रधान विलियम पीट यांनी या योजनेवर सखोल विचार करून कॉर्नवालीस या सूचनेला उचलून धरले व जमीन महसुलाची ही व्यवस्था दशवार्षिक न ठेवता कायम स्वरूपाचे असेल अशी मान्यता दिली. यामुळेच या योजनेला कायमधारा पद्धती असे म्हटले जाते.(सप्टेंबर1792)

**कायमधारा पद्धतीची वैशिष्ट्ये किंवा स्वरूप**

1) जमीनदारांना जमिनीचे मालकी हक्क देण्यात आले.

2) मागच्या काही वर्षातील उत्पन्न आणि भविष्यातील वाढीव उत्पन्नाचा अंदाज घेऊन सरासरीने जास्तीत जास्त शेतसारा ठेवण्यात आला. 3) प्रथम 1791 मध्ये हा शेतसारा दहा वर्षांसाठी निश्चित करण्यात आला होता परंतु 1793 मध्ये तो कायमसाठी निश्चित करण्यात आला. त्यात आता वाढ करण्यात येणार नव्हती.

4)सरकारला निश्चित रक्कम देण्यात आल्यावर उर्वरित रकमेचा उपयोग जमीनदार घेऊ शकणार होते.

5)मात्र जमीनदार जमीन महसुलाची ठरलेली रक्कम सरकारकडे न भरू शकल्यास त्यांची जमीन जप्त करून ती विकण्याचा सरकारला अधिकार होता.

6) जमीनदार आपल्या कुळांची स्थिती सुधारण्याकडे लक्ष देतील अशी अपेक्षा होती.

7) जमीन महसूल जमीन धारण करून नियमितपणे मिळत असेल तोपर्यंत सरकार जमीनदार आणि त्यांची कुळे यांच्यातील अंतर्गत संबंधाबाबत दखल देणार नाही, दुसऱ्या शब्दात आपल्या कुळांशी त्यांनी कसे संबंध ठेवावे याबद्दल जमीनदारणा स्वातंत्र्य देण्यात आले होते. मात्र जमीनदारांनी आपल्या रयतेला पट्टा द्यावयाचा होता. त्याचा भंग झाल्यास रयतेला न्यायालयात जाण्याचा अधिकार होता.

8) जमीनदारांकडून न्यायदान संबंधीचे सर्व अधिकार काढून घेण्यात आले होते.

9) जमीन महसुलाचे दर ठरवताना 1765 मध्ये जो जमीन महसूल होता त्याच्या दुप्पट ठेवण्यात आला होता. कारण यात उत्पादन वाढले तरी दर वाढणार नव्हते.

10) राज्यात दुष्काळ पडो वा अतिवृष्टीने पीक नष्ट होवो आणि पीक उगवले नाही तरीही सरकारच्या तिजोरीत जमीन महसुलाची ठराविक रक्कम दरवर्षी नियमितपणे येणार होती.

**व्याप्ती**

कॉर्नवालीस ची ही पद्धत सुरुवातीला बंगालमध्ये त्यानंतर बिहार, ओरिसा, बनारस विभाग व उत्तर कर्नाटक आणि वाराणसी जिल्ह्यात लागू करण्यात आली.

**फायदे किंवा गुण**

1) या पद्धतीमुळे कंपनीला फायदा झाला कारण त्यांचे उत्पन्न बरेच वाढले कारण जमीन महसुलाची दर 1765 मधील दराच्या दुप्पट होते.

2) कायमधारा पद्धती मुळे आता जमीन महसुलाच्या वसुलीसाठी सैनिक किंवा इतर नोकरवर्ग ठेवण्याची कंपनीला गरज उरली नव्हती. सहाजिकच, या नोकर वर्ग व कराव्या लागणाऱ्या खर्चात बचत झाली व एका परीने हा कंपनीचा आर्थिक लाभ होता.

3) कंपनी सरकारचा नोकरवर्ग आता निश्चिंत झाला कारण शेतीची लागवड झाली किंवा नाही झाली तरी त्यांना जमीनदाराकडून ठरलेली रक्कम निश्चित पणे मिळणार होती.

4) कंपनीला आता या जमीन महसुलाच्या वसुलीबाबत फारसा नोकरवर्ग भरण्याची भरती करण्याची गरज उरली नव्हती. सहाजिकच या मंडळींकडून ते प्रशासनातील अन्य कामे करून घेऊ शकत होते.

5) शेतीविकासाला उत्तेजन मिळाले. या योजनेमध्ये जमीनदारांचा लाभ होता. कारण त्यांना जमिनीतील उत्पन्न वाढले तरी आणि अधिक जमीन लागवडीखाली आणली तरी जमीन महसुलात कोणत्याही कारणाने वाढ होणार नव्हती. कारण जमीन महसूल हा कायमचा निश्चित ठरलेला होता. सहाजिकच जमीनदारांनी शेतीच्या विकासाकडे लक्ष दिले. त्यासाठी एक आमिष किंवा प्रोत्साहन म्हणून कायमधारा पद्धती कारणीभूत ठरली. अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणली गेली. यासाठी जंगले तोडून जमीन लागवडीसाठी योग्य केली गेली. परिणामी शेतीमधील उत्पन्न वाढले. जमिनीच्या किमती वाढल्या. आता जमीनदारांना आपापल्या भागात शांतता सुव्यवस्था ठेवण्याच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात आले म्हणून ते आपला वेळ शेती विकासाला देऊ शकत होते.

6) जमीनदारांचे उत्पन्न वाढले आणि या वाढीव उत्पन्नातून त्यांनी व्यापार-उदीम व उद्योग क्षेत्रात प्रवेश केला. परिणामी उद्योगाचा आणि व्यापाराचा विकास व विस्तार झाला.

7) असे जरी दिसत असले तरी कंपनीने जमीन महसूल कायमचा ठरवून दिला होता व त्यात आता उत्पन्न वाढले किंवा अधिक जमीन लागवडीखाली आली तरी वाढ होणार नव्हती. म्हणून एका परीने हे कंपनीसाठी नुकसानकारक होते. पण कंपनी जमीनदाराकडील वाढीव संपत्ती किंवा उत्पन्नावर वेगळे कर बसू शकत होती. थोडक्यात जमीनदाराच्या वाढीव उत्पन्नाचा काही भाग वेगळ्या मार्गाने आपल्याकडे घेणे कंपनीला शक्य होते तसेच आर्थिक व्यवहारावर व्यापार उद्योग यावर कर बसून उत्पन्न वाढवणे कंपनीला शक्य होते.

**कायमधारा पद्धती चे दोष**

1) जमीन महसूलाची दर बरेच जास्त होते. जे जमीनदार हे दर देऊ शकले नाहीत त्यांना आपल्या जमिनी सरकारला त्या पैशाच्या-थकबाकी पोटी द्याव्या लागल्या. काही ठिकाणी सरकारने स्वतः जमीनी आपल्या ताब्यात घेतल्या. परिणामी, जमीनदारांना आपले उत्पन्नाचे साधन गमवावे लागले.

2)जे जमीनदार सरकारच्या वाट्याचा जमीन महसूल देऊ शकले त्यांनी जमिनीकडे लक्ष देऊन त्यात उत्पन्न वाढविले होते. ते संपन्न झाले परंतु असे संपन्न झालेले जमीनदार खेड्यात न राहता शहरात राहून ख्यालीखुशाली व चैनीत दिवस घालवू लागले त्यांना अनुपस्थित जमीनदार म्हणून ओळखले जाऊ लागले.

3)या शहरात राहणाऱ्या जमीनदारांनी आपल्या ताब्यातील शेती पाहण्यासाठी व जमीन महसूल वसुलीसाठी आपल्या प्रतिनिधीची नेमणूक केली. या प्रतिनिधींनी रयतेवर अन्याय ,अत्याचार करून स्वार्थ साधला व पैसा उकळला. जमीनदाराने ठरवून दिलेल्या महसूलापेक्षा 20 ते 40 टक्के रक्कम जास्त प्रमाणात या जमीनदाराच्या प्रतिनिधींनी रयतेकडून वसूल केली.

4) जमीनदारांनी पट्टा शेतकऱ्यांना देणे बंधनकारक होते आणि शेतकऱ्याच्या संबंधातील काही हक्क आणि अधिकारांचे उल्लंघन जमीन दाराकडून झाल्यास शेतकरी न्यायालयात दाद मागू शकत होते. पण हे सर्व फक्त कागदोपत्री होते. वास्तवात हे शक्य नव्हते कारण एक तर न्यायालयात जाऊन खटला चालवणे शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या शक्य नव्हते आणि जमीनदारांकडे सत्ता, पैसा इत्यादी सर्व साधने असल्यामुळे प्रकरण आपल्याला हवे तसे वळवून घेणे त्यांना शक्य होते. 5) या योजनेत रयत किंवा शेतकर्‍यांच्या हक्काकडे दुर्लक्ष केले गेले. वस्तुतः जमिनीचे मालक खरे शेतकरी होते. पण इंग्रज सरकारने मात्र जमीनदारांना जमिनीची मालकी देऊन त्यांच्याशी हा करार केला आणि शेतकरी हे त्यांच्या वारसाहक्काने चालत आलेल्या जमिनीच्या मालकी पासून बेदखल केले गेले.

6) या योजनेत कंपनीचे ही आर्थिक नुकसान झाले होते. इतर राज्यांशी तुलना केली असता हे सहज लक्षात येते. एक तर शेतसारा

वाढविण्याची तरतूद नव्हती आणि पुढे पैशाचे अवमूल्यन झाल्यावर तर मिळणाऱ्या उत्पन्नाचे मूल्य आणखीनच कमी झाले.

7) वेळेवर व रोखीचा महसूल भरणा करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांना सावकारांकडून कर्ज घ्यावे लागत असे ज्या जमिनीसाठी महसूल भरावयाचा तिचीच विक्री करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली.

**समारोप**

लॉर्ड कॉर्नवालीस च्या या कायमधारा पद्धती ऐवजी जॉन शोअर यांनी सुचविलेली दशवार्षिक पद्धत अधिक योग्य ठरली असती. कारण मधल्या काळात या योजनेतील उणिवा लक्षात आल्या असत्या. म्हणूनच असे म्हटले जाते की कायमधारा पेक्षा दीर्घ मुदतीची योजना अमलात आणली असती तर तिची मुदत संपल्यावर कंपनीला शेतकऱ्यांच्या रकमेत वाढ करता आली असती. पण ते आता शक्य नव्हते. जमीनदारांच्या कुळांना किंवा शेतकऱ्यांना कंपनीने कोणतेही संरक्षण दिले नव्हते तर उलट त्यांना जमीनदारांच्या दयेवर सोडून दिले होते. जमीनदारांनी जर एकदा शेतसारा ठरलेल्या रक्कमे प्रमाणे नियमितपणे भरला तर कंपनीच्या नंतर जमीनदार शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षात किती जमीन महसूल वसूल करतात याकडे लक्ष देत नसत. सहाजिकच जमीनदार हे रयतेकडून जास्तीत जास्त रक्कम मूळ 16 कोटी वसूल करीत असत. कारण सरकारकडे भरलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांकडून वसूल करतील तितका त्यांचा फायदा होता आणि याबाबत त्यांना अडवणारे कोणीही नव्हते. गरीब आणि पीडित रयतेमध्ये आपल्यावरील अन्याय विरुद्ध लढण्याची शक्ती नव्हती. सर्वच जमीनदारांनी आपल्या वाढीव उत्पन्नातून शेतीच्या विकासासाठी खर्च केला नाही. किंवा एकूणच आपल्या ताब्यातील जमिनी मधून उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी किंवा अधिक जमीन लागवडीखाली आणण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्न केले नाहीत. यापैकी बरेच जमीनदार शहरात राहण्यासाठी केले व विलासी जीवनाचा आस्वाद घेण्यात मग्न झाले. बंगालमध्ये लागू केलेली कायमधारा पद्धत ही आर्थिक दृष्ट्या सदोष आणि अव्यवहारी होती. म्हणून त्यानंतर ब्रिटिशांकडून त्यांच्या ताब्यातील भारतातील कोणत्याही प्रदेशात लागू केली गेली नाही. हाच या योजनेच्या आर्थिक उणिवांचा पुरावा म्हणता येईल, परंतु काही चे मत मात्र वेगळे आहे. त्यांच्या मते 'प्रजेची सुख आणि समृद्धी जर राज्याच्या यशाचे गमक असेल तर लोर्ड कॉर्नवॉलीस ची कायमधारा पद्धती ब्रिटिशांनी भारतात कार्यान्वित केलेल्या सर्व योजनांमध्ये यशस्वी ठरली असे म्हणता येईल'. पी.ई. रॉबर्ट्स यांनी असे म्हटले आहे की "दीर्घकाळासाठी ही योजना कायमसाठी न राबवता अस्थायी स्वरूपात राबवली असती तर त्याचे दोष उणीवा व फायदे कळू शकले असते व त्या भविष्यात बदल करता आले असते".

## रयतवारी पद्धत

रयत याचा अर्थ प्रामुख्याने प्रजा. परंतु त्या काळात शेती करणारा वर्ग संख्येने जास्त असल्यामुळे रयत म्हणजे शेतकरी वर्ग असेच समजले जाई. या योजनेत शेतकऱ्यांशी थेट संबंध प्रस्थापित केले गेले. कायमधारा महसूल पद्धतीने झालेले नुकसान भरून काढण्यासाठी कंपनीची मंडळी नव्या महसूल पद्धतीचा विचार करत होती. तसेच शेतकऱ्यांना जमीनदाराच्या हवाली केल्या मुळे जमीनदारी पद्धतीने शेतकऱ्यांचा छळ किंवा शोषण झाले होते. ते थांबविण्यासाठी नव्या महसूल पद्धतीचा विचार सुरू होता. रयतवारी पद्धतीनुसार प्रत्येक पंजीकृत भूमी धारकाला भूमिस्वामी म्हणून मान्यता देऊन सरकारला कर देण्यास जबाबदार धरण्यात आले. त्याला आपली जमीन किरायाने देण्याचा, हस्तांतर करण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा विकण्याचा अधिकार होता. आपला भूमीकर तो सरकारला व्यवस्थित देत असे पर्यंत त्याचे अधिकार हिरावून घेतल्या जात नव्हते.

**मद्रासमधील पद्धती:-**

मद्रास इलाख्यात सर्वप्रथम भूमि व्यवस्था बारामहाल जिल्हा प्राप्त झाल्यानंतर 1792 मध्ये करण्यात आली. थॉमस मन्रो च्या मदतीने कॅप्टन रिडने शेतजमिनीच्या उत्पन्नाचा अंदाज बांधून त्याच्या 50% भूमि कर निश्चित केला. नव्या जिंकलेल्या मद्रास कडील प्रदेशात कंपनीने तेथे पाठवलेल्या थॉमस मन्रो आणि कॅप्टन रीड या दोन अधिकाऱ्यांनी खेड्यांमधील रयतेकडून जमीन महसूल गोळा करण्यास

सुरुवात केली. या पद्धतीमध्ये जमिनीची पाहणी करून त्या जमिनीच्या उत्पादकतेच्या क्षमतेनुसार त्याची प्रतवारी व वर्गीकरण करण्यात आले. प्रायोगिक चाचण्या नंतर 1820 मध्ये मद्रास कडील कंपनीच्या अधिकाऱ्यांनी हे तत्व रयतवारी पद्धतीस लागू केले.

**थॉमस मन्रो आणि मद्रास ची व्यवस्था:-**

मद्रासचा 1820 ते 1827 पर्यंत गव्हर्नर राहिलेल्या थॉमस मन्रो ने जुनी करपद्धती अयोग्य ठरवली. त्याने एकूण उत्पन्नाच्या तिसरा भाग भूमी कर ठरवून, कायम भूमि व्यवस्था असलेल्या प्रदेशांना वगळून, बाकी संपूर्ण प्रांतात रयतवारी पद्धती लागू केली. या योजनेत जमीनदार किंवा अन्य कोणीही मध्यस्थ नसल्यामुळे शेतसाऱ्याची सर्व रक्कम ही सरकारलाच थेट मिळणार होती. परंतु इथे सरकारचा महसूल हा उत्पन्नाच्या साधारणपणे 50 टक्के इतका ठेवण्यात आला होता. मद्रास इलाख्यातील काही भाग व मुंबई इलाख्यात, आसाम आणि अन्य ठिकाणी ही पद्धत लागू केली. महसुलाची आकारणी कायम स्वरूपाची नव्हती. दर वीस किंवा तीस वर्षांनी महसूल पद्धतीत सुधारणा करून महसुलाच्या प्रमाणात वाढ करण्यात येत असे. शेतसाराचे प्रमाण साधारणपणे 1/3 होते.

**मुंबई इलाख्यातील महसूल व्यवस्था:-**

रयतवारी पद्धत मुंबई इलाख्यात सुरू केलेली होती. मुंबई इलाख्यात कंपनीचे जमीनदार किंवा गाव समुदायास वगळण्यासाठी रयतवारी पद्धत लागू केली. यामध्ये टप्पे पुढीलप्रमाणे होते.

मुंबई इलाख्याचे गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी ऑक्टोबर 1819 मध्ये मराठा शासनाच्या महसूल पद्धती बद्दल तपशीलवार अहवाल सादर केला होता. 1824 ते 1828 च्या दरम्यान प्रिंगलेने जमिनीचे नियमित सर्वेक्षण केले आणि निव्वळ उत्पादनाच्या 55 टक्के भाग सरकारचा हिस्सा म्हणून निश्चित केला. परंतु केलेले सर्वेक्षण सदोष होते उत्पन्नाचा केलेला अंदाज योग्य नव्हता, परिणामी जमीन महसुलाचे प्रमाण अधिक असल्याने शेतकरी त्रस्त झाला. 1835 मध्ये अभियांत्रिकी विभागातील अधिकारी लेफ्टनंट बींगगेट इमाला भूमी सर्वेक्षणाचा अधीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याने मागील महसूल शेतकऱ्याचे उत्पन्न व उत्पादन क्षमता लक्षात घेऊन महसूल ठरविण्यात आला. ही व्यवस्था 30 वर्षासाठी लागू करण्यात आली. तथापि ही व्यवस्था देखील शेतातील उत्पन्नाच्या केवळ अंदाजावर आधारलेली होती आणि कठोर होती. असे म्हटले जाते की इथे सरकारने जो महसूल ठेवला होता तो इतका जास्त आणि अवास्तव होता की शेतकऱ्यांनी शेती सोडून जवळच्या संस्थानात कामाच्या शोधार्थ जाणे पसंत केले. या योजनेत दुरुस्ती करून अधिक वास्तववादी महसूल आकारणी करण्याचा प्रयत्न केला गेला. या योजनेत जमिनीची मालकी शेतकऱ्याकडे आल्यामुळे जेव्हा तो रोखिने शेतसारा भरू शकला नाही तेव्हा त्याने आपली जमीन सावकाराला विकली. म्हणूनच या भागात पुढे1875 मध्ये दख्खनचे दंगे झाले. जे उठाव प्रामुख्याने सावकारांच्या विरुद्ध होते. या योजनेत शेतकऱ्याचे इतर योजना प्रमाणेच भले झाले नाही.

**रयतवारी पद्धतीचे गुण:-**

1) या पद्धतीमुळे कंपनी सरकार यांच्यातील जमीनदार या मध्यस्थाचे उच्चाटन करण्यात आले.

2) सरकार शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करू लागले.

3) शेतकरी जमिनीचा मालक बनला व तो सरकारला महसूल देण्यास जबाबदार होता.

4) शासन व जनता यांच्यात प्रत्यक्ष संबंध निर्माण झाले.

5) रयतेला शेती करण्याचे स्वातंत्र्य मिळाले.

**रयतवारी पद्धतीचे दोष:-**

1)या पद्धतीत शेतकऱ्यांच्या अधिकाराचे रक्षण होत नव्हते.

2) शेतकऱ्यांना कोणताही आर्थिक फायदा झाला नाही.

3)शेतकऱ्यांना अपेक्षित असलेले जमिनीवरील मालकी हक्क त्यांना मिळाले नाहीत.

4)शेतकऱ्यांना नियमित शेतसारा भरावा लागे नाही भरल्यास त्यांच्याकडील जमीन सरकार काढून घेत असे.

5)सरकारला शेतसारा वाढविण्याचा अधिकार असल्याने त्याचा गैरफायदा घेण्यात आला.
6)या पद्धतीत शेतसाऱ्यांचे प्रमाण अधिक होते.
7)शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार त्यांच्या जमिनी लुबाडू लागले.

## महालवरी पद्धती

या पद्धतीमध्ये महसूल ठरविताना जे एकक वापरले गेले ते महाल असे होते. ज्यात काही खेड्यांचा समावेश होत असे म्हणूनच या पद्धतीमध्ये देखील जमीनदारांचे अस्तित्व टिकून राहिले. कारण त्यांच्या ताब्यात एकापेक्षा अधिक खेडी असू शकतात. असे म्हटले जाते की, 1813 च्या चार्टर एक्ट ने कंपनीची भारताशी असलेल्या व्यापारावरील मक्तेदारी संपुष्टात आणली गेली व आता मुक्त व्यापाराचे धोरण ब्रिटिश सरकारने स्वीकारले होते व आता त्यांना भारतात एक व्यापक असा त्यांना पाठिंबा देणारा वर्ग हवा होता. म्हणून कंपनीच्या प्रमुख मंडळींनी असा विचार केला की संख्येने कमी असलेल्या जमीनदार वर्गावर अवलंबून राहण्यापेक्षा, त्यांच्या पेक्षा लहान जमीनदार तालू- केदार. पट्टेदार आदींना नव्या योजनेत स्थान देऊन त्यांचा पाठिंबा मिळावा, जेणे करून ही मंडळी ब्रिटिश सत्तेचा आधार राहील.

**1822 चे नियमन:-**

आयुक्त मंडळाचा सचिव होल्ट मॅकेन्झी याने 1819 मध्ये महसूल व्यवस्थेसाठी शिफारशी केल्या. त्यामध्ये जमिनीचे सर्वेक्षण करावे, भूमीवरील अधिकाऱ्यांचे रेकॉर्ड तयार करून प्रत्येक गावाचा व महालाचा महसूल निश्चित करण्यात यावा आणि कर वसुलीचे काम ग्राम प्रमुखाकडे किंवा नंबरदाराकडे देण्यात यावे इत्यादीचा समावेश होता.

1822 च्या नियम 7 नुसार या शिफारशीला कायदेशीर रूप देण्यात आले. त्यानुसार जमिनीचा जो भाडे दर जमीनदाराला द्यावा लागत होता, त्याच्या 80% भूमिकर निश्चित करण्यात आला. जिथे भूमिस्वामी जमीनदार नव्हते आणि जमीन शेतकऱ्यां तर्फे संयुक्त तत्त्वाने पिकविली जात होती, तेथे हा दर 95 टक्के लावण्यात आला. ही योजना उत्तर भारतात संयुक्तप्रांत, वायव्य सरहद्द प्रांत, मध्य भारतातील काही भाग व पंजाब या प्रदेशात लागू करण्यात आली होती. या योजनेत जमीन महसूल हा काही विशिष्ट काळासाठी निश्चित केला जात असे आणि हा गोळा करण्याची जबाबदारी खेड्यातील जमीनदार आणि त्यांच्याकडे महसूल वसुलीचे अधिकार परंपरेने चालत आलेले आहेत अशा मंडळी किंवा महालातील वर उल्लेख केल्याप्रमाणे वंशपरंपरागत किंवा पारंपारिक अधिकार असलेली मंडळी यांच्यावर सोपविण्यात आली. मात्र जमीनदारांना जमिनीचे वंशपरंपरागत मालक आहेत हे तत्व यात मान्य करण्यात आले नव्हते. जमीनदारावर फक्त महसुलाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. तथापि वेळोवेळी पाहणी करून त्यात योग्य ते बदल करण्याचे अधिकार सरकारने आपल्याकडे ठेवले होते. या व्यवस्थेचे आणखी एक वैशिष्ट्य असे होते की गावातील प्रमुख मंडळी ही महसुलाच्या व्यवस्थेची सामूहिक जबाबदारी घेत असत. गावावर ती या व्यवस्थेमध्ये आकारण्यात आलेला महसूल ते आपसात वाटून घेत असत. परंतु अंततः यात प्रत्येक जण स्वतःच्या आणि इतरांच्या महसुलाच्या वसुलीला जबाबदार असे. तथापि काहींच्या मते जमीनदारी पद्धतीचेच एक सुधारित स्वरूप म्हणजे ही योजना होती. या पद्धतीने कष्टकरी शेतकऱ्यांना काही फायदा झाला नाही.

**1833चे नियमन-9 आणि मार्टिन बर्डची भूमीकर व्यवस्था**

वरील पद्धतीत शेतकऱ्यांना दिलासा मिळाला नाही. खेड्यातील वरिष्ठ वर्गाला त्याचा फायदा झाला. सरकारी महसुलाची रक्कम जास्त होती. प्रारंभीच्या काळात एकूण उत्पन्नाच्या 2/3 इतकी रक्कम करण्यात येईल. त्यामुळे लॉर्ड विल्यम बेटिंग ने ती 60% केली आणि त्यानंतर काही प्रदेशात ती 50 % करण्यात आली. लॉर्ड विल्यम बेटिंग हा उदारमतवादी असल्याने व त्याला लोककल्याणाची तळमळ असल्याने त्याने 1822 च्या योजनेचे सखोल परीक्षण केले आणि हा निष्कर्ष काढला की, त्या योजनेमुळे जनतेला अतिशय कष्ट झाले आणि आपल्या अत्याधिक कठोरतेमुळे ही योजना समाप्त झाली.

विचार विनिमयानुसार 1833 मधील नियमाद्वारे भूमि चे उत्पन्न आणि भूमी दराचा अंदाज लावण्याची एक सरळ पद्धती तयार करण्यात आली. त्यासाठी शेताचे नकाशे व रजिस्टर्स तयार करण्यात आले. प्रथमच शेताचे नकाशे व रजिस्टर्स यांचा उपयोग करण्यात आला. ही नवीन योजना मार्टिन बर्ड च्या देखरेखीखाली लागू करण्यात आली त्याला उत्तर भारतातील भूमिकर व्यवस्थेचा प्रवर्तक असे म्हटले जाते. या योजनेअंतर्गत एकेका भागातील जमिनीचे सर्वेक्षण करून जमिनीचे क्षेत्रफळ, सीमा ठरवून त्यातील पिकाऊ जमीन व पडीत जमीन निश्चित केली जात होती. त्यानुसार संपूर्ण जमिनीचे व नंतर संपूर्ण ग्रामाचे भूमीकर ठरविले जात होते. प्रत्येक ग्रामातील किंवा महालातील अधिकाऱ्यांना स्थानिक गरजा लक्षात घेऊन समायोजन करण्याचा अधिकार होता. यातून 66 टक्के भाग सरकारला जात असे 34 टक्के भाग शेतकऱ्याकडे राहत असे. ही व्यवस्था 1833 मध्ये सुरु करण्यात आली. तिला मार्टिन बर्ड ची भूमिकर व्यवस्था म्हणूनही ओळखले जाते. ही व्यवस्था 30 वर्षाच्या मुदतीची करण्यात आली.

**ब्रिटिश कालीन महसूल व्यवस्थेची परिणाम किंवा योजनांचे मूल्यमापन:-**

ईस्ट इंडिया कंपनीच्या भूमी कर पद्धतीचा विशेष करून अत्याधिक करांचा तसेच नव्या प्रशासकीय आणि न्यायालय व्यवस्थेचा परिणाम म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था अस्ताव्यस्त होऊन गेली. भूमि व्यवस्था आणि न्याय हे ग्रामपंचायतीचे मुख्य कार्य समाप्त होऊन, पाटील म्हणजे फक्त सरकारमार्फत कर गोळा करणारा बनला होता. त्यामुळे खेड्यांची जुनी राजकीय, सामाजिक, आर्थिक जडणघडण राहिली नाही. भारतातील कुटिरोद्योग जवळजवळ संपुष्टात आले आणि खेड्यात सर्वात जास्त महत्त्व जमीनीला प्राप्त झाले. महसुलात केलेल्या बदलामुळे म्हणजेच शेतकऱ्यांना जमिनीचे मालक केल्यामुळे, त्यांच्याकडून जमीन हिसकावून घेणे अधिक सोपे झाले. पूर्वी जमिनीची मालकी संपूर्ण गावाची असे व जमिनीची खरेदी-विक्री होत नसे, परंतु आता शेतसारा भरण्यास पैसे नाहीत किंवा सावकाराचे कर्ज खूप झाले आहे अशा वेळी शेतकरी आपली जमीन विकून टाकून शेतमजूर म्हणून काम करीत असे. या योजनांपैकी कोणतीही योजना खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या हिताची सिद्ध झाली नाही. कारण मुळात या योजनाचा उद्देश कंपनी सरकारला जास्तीत जास्त जमीन महसूल सोप्या पद्धतीने कसा वसूल करता येईल एवढाच होता. जो सरकारने साध्य केला. कारण कंपनीने सर्व योजनांमध्ये महसुलाची रक्कम जास्त ठेवली होती. नव्या भूमीकर व्यवस्थेमुळे भूमी आणि शेतकरी दोन्ही घटक अस्थिर बनले. परिणामी खेड्यांमध्ये सावकार किंवा अनुपस्थित जमीनदार हे दोन घटक उदयास आले. प्रत्यक्ष शेतापासून दूर शहरात राहणारा एक जमीनदारांचा वेगळा वर्ग या काळात अस्तित्वात आला, ज्यांना अनुपस्थित जमीनदारांचा वर्ग असे म्हटले गेले. जमीन कसणे परवडेनासे झाले म्हणजे ती इतरांना कसण्यासाठी देणे किंवा विकून टाकणे हे मार्ग स्वीकारले गेले. अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्त्व यामुळे घटले. शेतीवर अवलंबून असलेल्यांची संख्या वाढल्यामुळे शेतीचे लहान लहान तुकड्यात विभाजन झाले. या नव्या व्यवस्थेने ग्रामीण भागात विविध घटक उदयाला आले. जसे, व्यापारी, भूमिहीन मजूर, जमीनदार, भाडेपट्टीनेजमीन कसणारे,अनुपस्थित जमीनदार आणि सावकार इत्यादी. या सर्व परिस्थितीमुळे खेड्यात जमीनदार आणि सावकारांचे महत्व अतोनात वाढले. कारण शेतकरीवर्ग त्यांच्या कृपेने व देणे जगत होता. छोटे-छोटे शेतकरी, मजूर, भूमिहीन वर्ग यांची संख्या वाढू लागली.परस्पर सहकार्याची भावना लोप पावून परस्पर स्पर्धा आणि वैयक्तिक लाभ असे वातावरण निर्माण झाले. भांडवलशाही निर्माण होण्याची ती प्रारंभिक लक्षणे होती. अशा बदलत्या स्थितीत खूप पैसा लागणारी उत्पादनाची नवनवीन साधने, मुद्रा अर्थव्यवस्था, शेतीचे व्यापारीकरण, दळणवळणाची सुधारणा, जागतिक बाजारपेठेची संबंध या आणि अशाच प्रकारच्या तत्वांनी जामीन अर्थव्यवस्थेचा आणि भारतीय कृषी क्षेत्राला एक नवे रूप प्रदान केले.

## द्रव्यापहरणाचा सिद्धांत किंवा संपत्तीचे निस्सारण

संपत्तीचे निसारण हे ब्रिटिश राजवटीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. निस्सारण म्हणजे वाहून जाणे. वेगळ्या मार्गाने संपत्तीचा ओघ भारताकडून इंग्लंडकडे वाहू लागला. या प्रक्रियेला द्रव्यापहरण किंवा संपत्तीचे निसारण असे म्हणतात. भारतातून इंग्लंडमध्ये जात असलेल्या संपत्तीच्या सततच्या प्रवाहाला भारतीय नेत्यांनी व अर्थतज्ञांनी संपत्तीचे अपहरण किंवा द्रव्यापहरण अशी संज्ञा दिली. आपल्या सत्तेच्या काळात प्रारंभी कंपनीने आणि त्यानंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतीयांचे पद्धतशीररीत्या आर्थिक शोषण केले. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे मार्ग शोधले होते. भारतातील पैश्या बरोबरच भारतातील शेती उत्पादने, खनिज इत्यादी साधन सामुग्रीचे ही ब्रिटिशांनी शोषण करून आपला देश समृद्ध केला होता.

मध्ययुगात ज्या परकीय आक्रमकांनी भारतावर आक्रमण करून भारताची लूट केली व त्यामुळे भारताचे जे नुकसान झाले, त्यापेक्षा ब्रिटीशांनी केलेली लूट आणि त्याचे आर्थिक दुष्परिणाम हे अधिक भयंकर होते. ब्रिटिशांनी भारतातून इंग्लंड कडे संपत्ती पाठवीत असताना विविध मार्गाचा अवलंब केला होता. मध्ययुगीन काळातील बहुसंख्य आक्रमक भारतातच स्थायिक झाले. भारतीय बनले. काही आक्रमकांनी भारतालाच आपले घर मानले. ते भारतीय समाजाचे अविभाज्य भाग बनले. त्यांनी भारतातून मिळालेला पैसा भारतीयांसाठी खर्च केला. परंतु ब्रिटिश मात्र कायमच परके राहिले. त्यांनी भारतातील अधिकाधिक पैसा मिळवून ब्रिटनमध्ये पाठवून ब्रिटिशांसाठी साठी खर्च केला.

इ. स.1757 पर्यंत म्हणजे प्लासीच्या लढाईपासून च्या काळात कंपनी भारताशी जो व्यापार करीत होती, तो भारताला लाभदायक होता. व्यापाराचा समतोल भारताकडे झुकलेला होता. आणि इंग्लंडमधून सोने-चांदी भारताकडे येत होते. भारतात ब्रिटिशांची राजकीय सत्ता स्थापनेनंतर परिस्थिती बदलली. कारण आर्थिक धोरणे ठरविण्याचा अधिकार कंपनी सरकारला होता. यानंतर संपत्तीचा ओघ भारताकडून इंग्लंडकडे सुरू झाला. भारतातील सत्ता मिळाल्यानंतर कंपनीला कोट्यावधी रुपये मिळू लागले. रॉबर्ट क्लाइव्ह ने कंपनीसाठी, स्वतःसाठी व सैनिकांसाठी नबाबा कडून कोट्यवधी रुपये घेतले. प्लासीच्या युध्दानंतर बंगालच्या नबाब आपल्या मनाला येईल तितक्या वेळा बदलले. या प्रत्येक नबाबाला गादीवर बसवताना त्याच्याकडून लाखो रुपये वसूल करण्यात आले. बंगालच्या नबाबा कडून व सरंजामदाराकडून कंपनीने व कंपनीच्या अधिकाऱ्यांनी लक्षावधी रुपये बक्षीस म्हणून मिळवले.

कंपनीला बंगालमधील दिवानीचे अधिकार मिळाल्यानंतर, बंगालमध्ये दुहेरी राज्यव्यवस्था निर्माण केली. बंगालच्या आर्थिक व्यवस्थेवर कंपनीने नियंत्रण प्रस्थापित केले. नायब दिवान कर वसुली करून तो पैसा कंपनीच्या खजिन्यात जमा करीत. कंपनीचे नौकर नायब दिवानाकडून जास्तीत जास्त पैसा वसूल करीत होते. कंपनीला पुढील घटकांमधून संपत्ती मिळू लागली.

1 )भारतीय बाजारपेठेवर एकाधिकार असल्याने व्यापारातून मिळणारा नफा.

2) जुलमी जमीन महसूल धोरणाच्या अंमलबजावणीतुन मिळणारा नफा.

3) कंपनीच्या अधिकाऱ्याकडून जबरदस्तीने मिळविलेला पैसा.

4) कंपनीचे लष्करी व मुलकी पदाधिकारी इतर देशांच्या तुलनेत कितीतरी जास्त घेत असलेले वेतन.

याव्यतिरिक्त कंपनीने भारतात मिळालेला प्रचंड पैसा भांडवल रूपात गुंतविण्यास सुरुवात केली. कंपनीकडून भारत व इतर देशातून वस्तू खरेदी करून त्या निर्यात करण्याचे धोरण सुरू करण्यात आले. अशा कंपनीच्या खरेदीला त्यांनी 'गुंतवणूक' हे नाव दिले. यामधून त्यांना प्रचंड नफा मिळत होता. 1765 ते 1770 या काळात कंपनीने अशा गुंतवणुकी पोटी 40 लक्ष पौंड इतकी संपत्ती ब्रिटनला पाठवली. विशेष म्हणजे एवढा प्रचंड माल पाठवला जाऊन त्याच्या मोबदल्यात भारताला मात्र काही मिळत नव्हते, हेच संपत्तीचे निसारण होय.

अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत निस सारणाची रक्कम भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे 9% इतकी होती. विविध प्रकारचे कर, कंपनीच्या गोऱ्या मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांचा पगारा पोटी जाणारी रक्कम, कंपनीला होणारा व्यापारी फायदा इत्यादी विविध

भागांमधून भारतातील संपत्तीचे मोठ्या प्रमाणात निसारंण होत होते, तसेच येथील राजे-रजवाडे कडून कंपनी खंडणीच्या रूपाने मोठ्या प्रमाणात पैसा गोळा करीत होती. प्लासी ते वॉटर्लू (1757 ते 1815) या कालावधीत पन्नास ते शंभर कोटी पौंडाची संपत्ती भारतातून इंग्लंडला नेण्यात आली. असे विलियम डीगी या तज्ञांचे मत आहे. मद्रासच्या महसूल मंडळाचे अध्यक्ष जॉन सलिहान यांनी मोठे मार्मिक उद्गार काढले होते. या उदगाराचा  आशय असा की, 'आमची अर्थव्यवस्था ही एखाद्या स्पंजाप्रमाणे आहे. हा स्पंज गंगा नदीत बुडविला जातो आणि थेम्स नदीत पिळून रिकामा केला जातो'.

**आर्थिक निसारन्नाचे घटक किंवा तत्वे:-**

ब्रिटिशांनी भारतातील संपत्तीचे निसारण करण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब केला ते घटक किंवा तत्वे पुढील प्रमाणे

**1)ग्रहखर्च:-**

भारत मंत्री व त्यांचे कार्यालय यांचा पगार भारताच्या तिजोरीतून दिला जात असे. त्या खर्चाला होम चार्जेस असे म्हटले जाई.1857 च्या उठावाच्या आधी हा खर्च भारताच्या सरासरी उत्पन्नाच्या 10 ते 13 % इतका होता. 1897 ते 1901 या काळात तो 24 % झाला. 1901 ते 1902 मध्ये झालेला ग्रह खर्च अंदाजे 1 कोटी 73 लक्ष पौंड होता. 1921 ते 1922 मध्ये होम चार्जेस ब्रिटिश भारत सरकारच्या एकूण महसुलाच्या 40 टक्के पर्यंत होता.

होम चार्जेस मध्ये पुढील घटकांचा समावेश होता.

**अ)ईस्ट इंडिया कंपनीच्या भागधारकांना लाभांश:-**

सन1833 च्या कायद्याने कंपनीच्या भागधारकांना भारतीय उत्पन्नामधून 1874 पर्यंत 6 लक्ष 30000 पौंड दरवर्षी दिले जावे असे ठरले. 1874 मध्ये 45 लक्ष पौंडाचे कर्ज एवढ्यासाठी देण्यात आले की वाढीव दराने लाभांश देता यावा. शिवाय कर्जावरील व्याज सुरू राहील. यामधून लक्षावधी रुपये इंग्लंडला पाठविण्यात आले.

**ब)सार्वजनिक कर्जावरील व्याजखर्च:-**

ब्रिटिशांनी खंडप्राय भारत देशात ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अनेक युद्ध केली. तसेच अफगाण, ब्रह्मदेश, नेपाळ इत्यादी देशांशी झालेल्या युद्धामुळे कंपनीला प्रचंड पैसा खर्च करावा लागला. कंपनीला सात कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागले. याशिवाय रेल्वे, रस्ते, सिंचन सुविधा यासाठी कर्ज घ्यावे लागले. ही सगळी कर्जफेड भारताच्या राजस्व उत्पन्नातून करण्यात आली. यामधून पैसा भारतातून इंग्लंडमध्ये पोहोचला. अगदी 1950 पर्यंत हिंदुस्तान लिव्हर कंपनी, बुक बॉंड कंपनी या कंपन्या भारतात होत्या, परंतु त्यावरील मालकी हक्क ब्रिटनचा असल्याने त्यांचा सर्व नफा इंग्लंडला जात असे.

**क) लष्करी व मुलकी खर्च:-**

यामध्ये भारतातील मुलकी व लष्करी खात्यातील अधिकाऱ्यांचे पेन्शन व निवृत्तीचे मिळणारे फायदे देण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा समावेश होता. याशिवाय लंडनमध्ये असलेल्या इंडिया ऑफिसचा खर्च ब्रिटिश युद्ध कार्यालयाचा खर्च इत्यादीचा समावेश होता.

**ड) इंग्लंडमधील साधन सामुग्रीची खरेदी:-**

भारत मंत्री आणि भारत सरकार मुलकी, लष्करी व सागरी खात्यासाठी आवश्यक असणारी खरेदी इंग्लंडच्या बाजारपेठेतून करीत असत. याचा फायदा हा इंग्लंडचाच होत असे. 1861 ते 1920 या मधल्या काळात हा खर्च गृह खर्चाच्या 10.2 टक्के प्रतिवर्षी इतका होता.

**2) परकीय गुंतवणुकीवर दिले जाणारे व्याज:-**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतात खाजगी परकीय भांडवल येण्यास सुरुवात झाली. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील फार मोठा भाग परकीय गुंतवणुकीवर दिल्या जाणाऱ्या व्याज व लाभावर खर्च होत होता. यामधून प्रचंड पैसा भारताच्या बाहेर जाऊ लागला. दोन महायुद्धाच्या काळात दरवर्षी सुमारे 30 ते 60 कोटी रुपये परदेशात जात असत. परकीय भांडवलदार केवळ स्वतःच्या नफ्यासाठी

भारतात भांडवल गुंतवीत असत. त्यांना भारतात औद्योगिक विकास व्हावा याविषयी काहीही देणेघेणे नव्हते.

**3)परकीय बँका, विमा व जहाज कंपन्या:-**

भारतात काम करणाऱ्या परकीय बँका, विमा व जहाज कंपन्या कडून घेतलेल्या सेवांच्या मोबदल्यात ब्रिटिश भारत सरकारला मोठा खर्च करावा लागत असे. या कंपन्यांनी भारतात कोट्यावधी रुपयांचा नफा मिळवला. परंतु याचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे या कंपन्यांमुळे भारतीय कंपन्या पुढे जाऊ शकले नाहीत.

अशाप्रकारे भारतातील संपत्तीचे निसारण होत असलेले दिसून येते.

## दादाभाई नवरोजी व संपत्तीच्या निसारणाचा सिद्धांत:-

संपत्तीच्या निसारणाच्या संदर्भात भारतातील विचारवंत, अर्थतज्ञ व सुधारकांनी विवेचन केले आहे. लोकहितवादींनी म्हटले की, "ब्रिटिश काळात हिंदुस्तान ची लक्ष्मी दर्यापार जाऊ लागली". शोषणाच्या ब्रिटिश धोरणामुळे भारतीय शेतीची दुरावस्था ओढावली. संहारक असे दुष्काळ पडले. देशी उद्योगधंद्याचा ऱ्हास होऊन स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था कोलमडली. लोकहितवादींनी त्यांच्या शतपत्रात व लक्ष्मीज्ञान या ग्रंथात आर्थिक विवेचन केले. बंगालमध्ये राजा राममोहन राय यांनी 'खंडणी' या शब्दात आर्थिक शोषणाचे वर्णन केले आहे. भास्कर पांडुरंग तर्खडकर यांनी बॉम्बे टाइम्स या पत्रात म्हटले आहे' "ब्रिटिशांकडून होणारे शोषण म्हणजे भारताला आतापर्यंत भोगाव लागणारा कटू शाप होय".

आधुनिक भारताचे पितामह म्हणून दादाभाई नवरोजी यांना ओळखले जाते. त्यांनी भारताच्या आर्थिक परिस्थितीचे अभ्यासपूर्ण विवेचन केले. संपत्तीच्या निसारणाचा सिद्धांत त्यांनी 1871 मध्ये प्रथम ब्रिटनमध्ये मांडला. दादा भाईंनी 'पॉवट्री अँड अनब्रिटिश रूल इन इंडिया' (भारताचे दारिद्र्य) हा ग्रंथ लिहिला. त्यांचा हा ग्रंथ 1876 मध्ये प्रसिद्ध झाला. इंग्रजी राज्याला दैवी वरदान समजण्याच्या कालखंडात आपल्या अवनतीला आणि शोषणाला ब्रिटिश कसे जबाबदार आहेत हे दादाभाईंनी या ग्रंथात दाखवून दिले. या ग्रंथात त्यांनी दारिद्र्य, भारताचे राष्ट्रीय उत्पन्न, कर निती, भारताचे आर्थिक शोषण याबद्दल सविस्तर विवेचन केले आहे. त्यांनी हे दाखवून दिले की वार्षिक उत्पन्न 20 रुपये तर राहणीचा वार्षिक खर्च 34 रुपये आहे. यामुळे भारतीयांना जीवनावश्यक गरजा सुद्धा भागविता येत नाहीत. सैन्य, रेल्वे, ब्रिटिशांचे पगार भत्ते या वरच्या खर्चामुळे भारत मेटाकुटीला आला आहे. ब्रिटिश प्रशासन पद्धती अंतिमतः कशी सर्वांनाच घातक आहे हेही त्यांनी दाखवून दिले. भारतातील करांचा पैसा भारतात राहिला असता तर भारताचे एक वेळ भले झाले असते. परंतु या करांचा पैसा इंग्लंडकडे नेल्याने जी अवस्था झाली ती भीषण आहे.

## संपत्तीच्या निसारणाचे परिणाम:-

**1)भारताचे दारिद्र्य वाढले:-**

ब्रिटिशांनी केलेल्या द्रव्यापहरना मुळे भारताचे दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर वाढले. ब्रिटिशांनी सर्व मार्गांनी भारताची आर्थिक पिळवणूक केली होती. भारतावर अनेक आक्रमणे झाली त्यापैकी बहुतांश आक्रमकांनी भारतात राज्य स्थापन केली. त्यामुळे देशातला पैसा देशातच राहिला. परंतु ब्रिटिशांनी भारताचा पैसा इंग्लंडकडे पाठविण्यास सुरुवात केली. यामुळे भारताची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली.

**2)भारतीय शेती व शेतकऱ्यांवर भीषण परिणाम:-**

ब्रिटीशांच्या द्रव्यापहरणाच्या धोरणामुळे भारतीय शेती व शेतकऱ्यांवर भीषण परिणाम झाले. शेतकऱ्यांना परंपरागत पिकांऐवजी नगदी पिकांची लागवड करावी लागली. महसूल व्यवस्था वारंवार बदलल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा व हिताचा विचार न करता महसूल पद्धतीची अंमलबजावणी न झाल्याने विपरीत परिणाम झाले.

**3) इंग्लंड संपन्न व औद्योगिक राष्ट्र बनले:-**

द्रव्यापहरणामुळे देशात भांडवल जमा होऊ शकले नाही. त्यामुळे भारतातील औद्योगिक विकासाचा वेग मंदावला. परंतु भारतातील

पैसा इंग्लंडकडे जात राहिल्याने तेथे औद्योगिक विकासाचा साधनात व गतीत एकदम वाढ झाली. भारतात स्वस्त किमतीत कच्चामाल विकत घेऊन त्या आधारावर इंग्लंडने कापडाच्या गिरण्या सुरू केल्या. त्या गिरण्यात पक्का माल तयार करून पुन्हा तोच माल भारताच्या बाजारपेठेत इंग्लंड विकत असे. यातून इंग्लंडला प्रचंड संपत्ती मिळाली. त्यामुळे इंग्लंड सर्वात संपन्न व औद्योगिक राष्ट्र बनले.

**4) रोजगार व उत्पन्नावर परिणाम:-**

भारतातील संपत्ती इंग्लंडकडे जात होती. ही संपत्ती बाहेर जात होती आणि कर्जाच्या रुपाने पुन्हा भारतात येत होती. त्यावरील चक्रवाढ व्याज दिवसेंदिवस वाढत गेले व कर्जाचे घातचक्र सुरू राहिले. यामुळे भारताच्या रोजगार व उत्पन्नावर दूरगामी परिणाम झाला.

## अनोद्योगिकीकरण

**अनउद्योगीकरण म्हणजे काय?**

अनउद्योगीकरण याचा अर्थ उद्योगधंद्याचा विनाश घडून येणे. भारताचे पारंपारिक कुटीर उद्योग हस्तोद्योग व इतर विविध उद्योग होते त्यांचा विनाश ब्रिटीशांनी घडून आणला, अर्थात जोपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीची राजकीय सत्ता भारतात प्रस्थापित झाली नव्हती आणि कंपनी फक्त एक व्यापारी कंपनी म्हणून काम करत होती तोपर्यंत भारतीय उद्योगांना जड पोहोचविणे कंपनीला शक्य झाले नाही. परंतु 1757 मध्ये बंगाल, बिहार आणि ओरिसाची सत्ता हाती आल्यानंतर कंपनीने आपली धोरणे भारतीय उद्योगाच्या विनाश करण्याच्या दिशेने राबवली, पुढे भारताच्या इतर भागात आपली सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर हे धोरण त्यांनी राबविले. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती मुळे भारतातील उद्योग व्यवसाय मंदावले व त्यांचा अधिकाधिक त्रास होऊ लागला. साधारणपणे 1800ते 1850 या काळाला अनोद्योगिकीकरणाचा  काळ असे म्हणतात. या काळात भारतातील हस्तव्यवसाय मृतावस्थेत गेले.

**अठराव्या शतकाच्या पूर्वार्धातील भारतीय उद्योग धंदे:-**

अठराव्या शतकात भारत जगातील व्यापार उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र होते. भारतातील कुटिरोद्योग जगात सर्वाधिक विकसित होता. प्राचीन काळापासून भारतीय कलाकौशल्यांच्या अप्रतिम वस्तू जगप्रसिद्ध होत्या. उत्तम दर्जाचे सुती व रेशमी कापड, कलात्मक विणकाम केलेले कापड, साखर, शस्त्रे, धातूंची भांडी, कलात्मक दाग दागिने, औषधे, मौल्यवान रत्ने इत्यादी वस्तूंची भारतातून निर्यात होई.भारतीय कारागीर आपल्या कलाकौशल्यासाठी संपूर्ण जगात प्रसिद्ध होते. बंगालमधील ढाका व मुर्शिदाबाद, बिहारमधील पाटणा, उत्तरप्रदेशातील जोनपुर, वाराणसी, लखनऊ, आग्रा, पंजाब मधील मुलतान व लाहोर गुजरात मधील अहमदाबाद व सुरत, मध्य प्रदेशातील चंदेरी व बुऱ्हाणपूर, आंध्रा मधील मच्छलीपटनम्, विशाखापट्टनम व महाराष्ट्रातील औरंगाबाद ही शहरे म्हणजे कापड उद्योगाची भरभराटीस आलेली केंद्र होती. कश्मीर चा प्रदेश लोकरी उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. बंगाल, महाराष्ट्र व आंध्र प्रदेश ही जहाजबांधणी उद्योगाची महत्त्वाची केंद्रे होती. ढाक्याचे तलम मलमल आणि मोहक कशिदाकाम केलेल्या उंची  वस्त्रांना युरोपातील श्रीमंत वर्गाकडून वाढती मागणी होती. विदेशी बाजारपेठेमध्ये सुती कापडाच्या व्यापारात भारताची मक्तेदारी निर्माण झाली होती. भारतातील या समृद्धीला ब्रिटिश काळात ग्रहण लागले. भारतातील पारंपारिक उद्योग व औद्योगिक केंद्रे यांचा त्रास सुरू झाला.

**अनुद्योगिकरनाची कारणे:-**

**1)भारतातील कुटीर उद्योग व इतर उद्योगावर कंपनीचे निर्बंध:-**

18 व्या शतकापर्यंत भरभराटीस आलेल्या कुटिर उद्योग व इतर उद्योगावर ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी विविध अटी लादल्या. त्यांना जो कच्चा माल लागत होता तो महाग किमतीत त्यांना मिळेल अशी ब्रिटिशांनी व्यवस्था केली. सुती कापड व यांचे उत्पादन

किती करावयाचे यावर निर्बंध घातले आणि त्यांचा मोबदला सुद्धा कमी मिळेल याची तरतूद केली. त्यामुळे विणकर व इतर व्यवसाय अडचणीत आले. विनकरांचा व्यवसाय तोट्याचा झाल्याने हळूहळू त्यांनी आपले व्यवसाय बंद केले व ते इतर उद्योगाकडे वळले.

**2)मुक्त व्यापाराचे धोरण:-**

1813 चा चार्टर ॲक्ट द्वारे ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारी मक्तेदारी संपुष्टात आली व भारतात मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारले. ब्रिटनमधील सर्व व्यापारी कंपन्यांना भारताशी व्यापार करण्याची मुभा मिळाली. इंग्लंड ब्रिटनमध्ये आणि भारतात आपला माल विकला जावा म्हणून संरक्षक जकातीचे धोरण स्वीकारले. यामुळे भारतातील उद्योगावर परिणाम झाले. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे ब्रिटनला भारतातून स्वस्त दराने कच्चामाल घेण्याची व ब्रिटनमध्ये तयार झालेला पक्का माल विकत घेण्यासाठी भारतात बाजारपेठा उपलब्ध असण्याची आवश्यकता निर्माण झाली. म्हणून 1833 मध्ये हिंदुस्थान सरकारने ग्रेट ब्रिटनला कच्चामाल अतिशय स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी आणि ब्रिटनमधील माल भारतातील बाजारपेठेमध्ये विकला जावा म्हणून मुक्त व्यापाराचे धोरण स्वीकारले. अशा रीतीने सरकारच्या धोरणामुळे भारतीय व्यापाराला फार मोठा धक्का बसला.

**3) संस्थांनी आश्रयाचाअभाव:-**

भारतीय राजेरजवाडे कलांचे आश्रयदाते होते. त्यांनी अनेक भारतीय कलाकारांना आणि कारागिरांना आश्रय दिला होता परंतु अठराव्या शतकात भारतीय राजेरजवाडे यांचे युग संपले. त्यामुळे अनेक कारागिरांना मिळणारा आश्रय संपुष्टात आला. ब्रिटिशांनी भारतातील संस्थाने विलीन केली. स्वतंत्रअसलेली काही संस्थांने कंपनीच्या वर्चस्वाखाली दबून गेली, त्यामुळे शहरी हस्तउद्योगापासून उत्पादित होणाऱ्या उंची मालाला या संस्थांना मधून असणारी मागणी एकदम घटली. चैनीच्या वस्तू घेणारे राजदरबार नष्ट झाले. त्यामुळे सहाजिकच संबंधित उद्योगधंद्याचा ह्रास होऊ लागला.

**4) भारतातील उद्योगांचे खच्चीकरण करण्याचे इंग्रजांचे धोरण:-**

बंगाल, बिहार आणि ओरिसा या प्रांतात ब्रिटिशांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यानंतर आणि ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर ब्रिटिशांनी भारतातील उद्योगधंद्याचे खच्चीकरण करण्याचे धोरण स्वीकारले. भारतातील लघुउद्योग किंवा हस्तव्यवसाय बंद पडावा याकरिता इंग्रजांनी हरतऱ्हेचे उपाय योजले. कुटीरउद्योग वाढतील किंवा त्यांचा विकास होऊ शकेल अशी परिस्थिती ठेवली नाही. भारतीय उद्योजकांनी नव उद्योगधंदे सुरू करण्याची तयारी दर्शविली परंतु त्यांना परवानगी नाकारण्यात आली. या परिस्थितीत अनुद्योगिकरनाचा कालखंड निर्माण झाला. भारतीय विक्रेत्यांना पडत्या भावाने आपला माल विकणे भाग पाडण्यात येईल या पद्धतशीर जुमल्या पायी असंख्य भारतीय उत्पादकांचे धंदे बसले.

**5)भारतीय मालावर जकात:-**

ब्रिटिशांनी भारताच्या निर्यात मालावर अधिक जकात वाढविल्यामुळे भारतातून होणारी निर्यात कमी झाली. वास्तविक पाहता भारत हा हस्तउद्योग मालाचा विशेषतः कापडाचा निर्यातदार देश होता. परंतु इंग्लंडमधील उत्पादित मालास संरक्षण देण्यासाठी भारतीय मालावरील जकाती वाढविल्या. 1700आणि 1720मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने कायदे करून भारतीय सुती व रेशमी कापड यांच्या वापरावर इंग्लंडवासीयासाठी निर्बंध लादले. दुसरीकडे इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या मालाला उदार सवलती दिल्या.इंग्लंड मध्ये जाणाऱ्या मालावर 1787 मध्ये 75 टक्के जकात होती. भारतातील मलमली ची निर्यात थांबविण्यात आली आणि इंग्लंड मधील तयार मालाची विशेषता कपड्याचीआयात वाढविण्यात आली.

**6) इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती व लोहमार्गाचा विकास:-**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती चे भारतीय उद्योग धंद्यावर दूरगामी परिणाम झाले. इंग्लंडमध्ये यंत्रावर तयार झालेला माल उत्तम प्रतीचा स्वस्त दरामध्ये व मोठ्या प्रमाणात मिळू लागला. या उलट भारतीयांच्या हस्तउद्योगात व कुटीरउद्योगात हाताने तयार केलेल्या मालाला, ब्रिटनच्या यंत्रावर तयार झालेल्या मालाशी स्पर्धा करणे कठीण झाले. यामुळे भारतातील मालाच्या उत्पादनाची मागणी घटली व उद्योग बंद पडू लागले. इंग्लंडमधील यंत्रनिर्मित कापडामुळे भारतातील विणकर बेकार झाले व यंत्र निर्मित सुतामुळे सूत कातनारे बेकार

झाले.

ब्रिटिशांनी भारतात निर्माण केलेल्या लोहमार्गाचे जाळे ब्रिटिश उद्योगधंद्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरले. 16 एप्रिल 1853 पासून मुंबई ठाणे लोहमार्गावर रेल्वे सुरू झाली. 1857 पर्यंत जवळ जवळ 288 लोहमार्ग बांधण्यात आला. 1905 पर्यंत सुमारे 35 ते 40 कोटी रुपये खर्च करून 28000 मैल लोहमार्ग बांधण्यात आले होते. रेल्वेमुळे ब्रिटिश माल भारताच्या कानाकोपऱ्यात जाऊ लागला. या मालाला शासनाकडून सवलती होत्या. यामुळे भारतीय मालावर परिणाम झाला व त्यांचे उत्पादन बंद झाले.

**औद्योगिक ह्रासाचे परिणाम:-**

**1)कारागिरांची दुर्दशा व औद्योगिक केंद्राचा ह्रास:-**

ब्रिटिश राजवटीमध्ये भारताच्या संपूर्ण शहरांमधील कसबी हस्तउद्योगांचा व स्वयंपूर्ण खेड्यांमधील कुटीरउद्योगचा ह्रास घडून आला. हस्तकलामधील कुशल कारागीर, सूतकताई करणारे व विणकर यांच्यावर बेकारीचे संकट आले. शेतकऱ्यांच्या जोड धंद्यावर परिणाम झाला. कारागिरांना शासकीय उत्तेजन नव्हते. रोजगाराच्या पर्यायी संधीही उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे कारागिराची दुर्दशा झाली. याशिवाय भारतातील भरभराट झालेली केंद्रे ढाका ,मुर्शिदाबाद, पाटणा, मछलीपट्टनम, लाहोर, मुलतान, कोईमतुर, मदुराई इत्यादींचा ह्रास होऊ लागला. या केंद्रांना दारिद्र्याने वेढले.

**2)स्वावलंबी ग्रामीण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली:-**

ब्रिटिशांच्या धोरणामुळे पारंपारिक ग्राम जीवनाची आर्थिक घडी विस्कटली.चार्ल्स मेटकाफ यांनी वर्णन केल्याप्रमाणे भारतीय खेडी ही जणू छोटी व स्वायत्त गणराज्ये होती. ब्रिटिशांनी या व्यवस्थेवर मोठा आघात केला. ब्रिटनमधील यंत्रावर तयार झालेला माल कमी किमतीत दळणवळणाच्या साह्याने भारताच्या ग्रामीण भागापर्यंत पोहोचला. त्यामुळे हस्तउद्योगात निर्माण झालेल्या मालाला उठाव राहिला नाही. वस्तुविनिमय पद्धतीची जागा रोखीच्या व्यवहारांने घेतली. या वातावरणात खेड्यांमधील उद्योग धंदे ह्रास पावले. ब्रिटिश काळात गावाच्या गरजा गावात भागेनाशा झाल्या. त्यामुळे स्वावलंबी असलेली खेडी परावलंबी बनवून उध्वस्त झाली. खेड्यांमधील धान्य माल व कच्चामाल परदेशापर्यंत जाऊ लागला. या प्रक्रियेवर ब्रिटिशांची पकड असल्यामुळे भारतीयांचे दुहेरी शोषण होत राहिले. ब्रिटिशांनी शोषलेल्या पैशाचा प्रवाह इंग्लंडमध्ये जाऊन तेथील अर्थव्यवस्थेचे पोषण करू लागला.

**3)शेतीवरील बोजा वाढला:-**

ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे भारतीय उद्योगधंदे बंद पडले. या उद्योगाशी संबंधित असणारे कामगार, कारागीर बेकार झाले. या सर्वांना पर्यायी रोजगार उपलब्ध होऊ शकला नाही. भारतातील जुने उद्योग बंद झाल्याने व नवे उद्योग सुरू न झाल्यामुळे नव्या रोजगारांची निर्मिती होऊ शकली नाही. त्यामुळे सर्व बेकार कामगार, कारागीर उपजीविकेसाठी शेतीकडे वळले. त्यामुळे शेतीवरील बोजा वाढला. ज्यांच्याजवळ शेतजमीन नव्हती ते शेत मजूर बनले. 19 व्या शतकाच्या मध्याला भारताच्या लोकसंख्येत शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण सुमारे 55 टक्के इतके होते.

**4)नवजागृती व आर्थिक राष्ट्रवादाला चालना मिळाली:-**

ब्रिटिश धोरणामुळे उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला. बेकारी वाढली. ग्रामीण जीवनाची स्वयंपूर्णता नष्ट झाल्यामुळे लोकांचे परावलंबित्व वाढले. यामुळे ग्रामीण जीवनाची स्वयंपूर्णता नष्ट झाली. दुसरीकडे ग्रामजीवनातील बंदिस्तता कमी झाली. खेड्यांचा बाह्य जगताशी संबंध वाढला. भारतीय खेडी जागतिक बाजारपेठेशी जोडली गेली. भारतीय उद्योगांचा ह्रास झाल्याने राष्ट्रीय नेत्यांनी त्या विरुद्ध आवाज उठविला. स्वदेशीचा पुरस्कार केल्याने आर्थिक राष्ट्रवाद वाढीस लागला. महात्मा गांधीजींनी स्वयंपूर्ण खेडेयांना विशेष महत्त्व दिले. दादाभाई नवरोजी व न्यायमूर्ती रानडे यांनी आर्थिक राष्ट्रवाद याविषयी जागृती निर्माण केली. विविध व्यावसायिकांच्या संघटना निर्माण झाल्या. आपल्या हक्कासाठी त्या लढा देऊ लागल्या. भारतीय समाजजीवन ढवळून निघाले. यामधून राष्ट्रीय जागृती होऊन राष्ट्रवादाला चालना मिळाली. थोडक्यात, भारतातील अनुउद्योगीकरण हे भारताच्या पारंपारिक उद्योगाखाली व त्यावर आधारित अर्थव्यवस्थेसाठी

घातक ठरले. भारतीय राष्ट्रवादाला मिळालेली चालना हे एक अनूउद्योगीकरण याचा चांगला परिणाम होता.